# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### वाणिज्य विभाग



राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरू महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी गणेश थिगळे यांचा सत्कार करताना प्राचार्य एन. एम. जरे.

# बँकिंग क्षेत्रातील संधींचा फायदा घ्या : गणेश थिगळे

**राजगुरूनगर, ता. २१ :** ‘‘बँकिंग क्षेत्रातील नवीन प्रवाहांमुळे निर्माण झालेल्या संधींचा अभ्यास त्यांचा फायदा घेऊन रोजगार मिळविला पाहिजे,’’ असे प्रतिपादन राजगुरूनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष गणेश थिगळे यांनी केले.’’

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी ‘बँकिंग क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी’ या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, बँकेचे संचालक सागर पाटोळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे आदी उपस्थित होते.

थिगळे पुढे म्हणाले, ‘‘नेट बँकिंग, ग्रीन बँकिंग, कॅशलेस बँकिंग या बँकिंग क्षेत्रातील विविध प्रवाहांमुळे पारंपरिक नोकरीपेक्षा वेगळ्या संधी निर्माण होत आहेत, त्या हेरल्या पाहिजेत. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण कठोर परिश्रम करण्याची गरज असून, ही त्रिसूत्री यशाचा मूलमंत्र आहे.’’

पाटोळे म्हणाले, ‘‘हॉटेल व्यवसायात उपलब्ध होणारा रोजगार, त्यामध्ये हाऊस किपिंग, फ्रंड डेस्क, अकाउंट, कुक, शेफ, मॅनेजर आदी विविध पदांसाठी अनेक उमेदवार आवश्यक असतात. हॉटेलिंग क्षेत्र भारतात विस्तारत असल्याने त्या बाजूला जाण्याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा.’’ कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य मंडळ प्रमुख प्रा. गणेश धुमाळ यांनी केले. सूत्रसंचालन धनंजय वाटेकर याने केले, तर आभार हसरी चक्कर हिने मानले.



बँकिंग क्षेत्राबाबतच्या कार्यशाळेला उपस्थित मान्यवर.

## ‘जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम हवे’

**राजगुरूनगर :** जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राजगुरूनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष गणेश थिगळे यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वाणिज्य मंडळातर्फे आयोजित बँकिंग क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी या विषयावर ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, बँकेचे माजी उपाध्यक्ष सागर पाटोळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे उपस्थित होते. थिगळे यांनी या प्रसंगी नेट बॅकिंग, ग्रीन बँकिंग, कॅशलेस बँकिंग या प्रवाहांबद्दल माहिती देऊन नोकरीच्या संधींबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक केले. राजगुरुनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सागर पाटोळे यांनी हॉटेल व्यवसायात उपलब्ध रोजगार, हाऊस किपींग, फ्रंट डेस्क, अकौंट, कूक, शेफ, मॅनेजर आदी पदांसाठी आवश्यक पात्रता व निवड पद्धतीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक वाणिज्य मंडळ प्रमुख प्रा. गणेश धुमाळ, तर सूत्रसंचालन धनंजय वाटेकर याने केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख